Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र. **M**

# Paper-III
# SOCIOLOGY

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

(Name) ................................................

2. (Signature) ........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ...........................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## DEC - 14313

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **36** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्याय प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Sociology
## Paper III
# समाजशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This Paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. In 2013, Justice J.S. Verma Committee was constituted to suggest :

(A) Prison reforms

(B) Electoral reforms

(C) Police reforms

(D) Amendments to laws relating to safety and security of women

1. सन 2013 मध्ये न्यायमुर्ती जे.एस. वर्मा समिती कशासाठी नेमण्यात आली होती ?

(A) तुरुंग सुधारणा

(B) निवडणूक सुधारणा

(C) पोलिस सुधारणा

(D) स्त्रियांची सुरक्षितता आणि संरक्षणविषयक कायद्यातील सुधारणा

2. Two statements are given below. One is labelled as Assertion (A) and the other is labelled as Reason (R) :

**Assertion (A) :** Despite continues planned initiatives for eradication of poverty, rural poverty ratio in India has not reduced substantially.

**Reason (R) :** High poverty ratio in rural areas is largely attributed to the socio-cultural practices of population remaining at lower rungs of the rural society.

In the context of the above statements, which one of the following is *correct* :

**Codes :**

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanatin of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

2. खाली एक विधान (A) आणि दुसऱ्यास कारण (R) असे संबोधले आहे :

**विधान (A) :** दारिद्र्य निर्मूलनासाठीचे नियोजनबद्ध प्रयत्न सातत्याने होऊनही भारतातील ग्रामीण दारिद्र्याचे गुणोत्तर लक्षणीयपणे घटलेले नाही.

**कारण (R) :** ग्रामीण भागातील दारिद्र्याचे उच्च गुणोत्तर ग्रामीण समाजाच्या तळाशी असलेल्या लोकांच्या सामाजिक-सांस्कृतिक व्यवहाराशी संबंधित आहे, असे म्हणतात.

वरील विधानांच्या संदर्भात खालीलपैकी योग्य संकेत निवडा :

(A) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत व (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) बरोबर आहे परंतु (R) चुकीचे आहे

(D) (A) चुकीचे आहे परंतु (R) बरोबर आहे

3. Match List I with List II and select the correct answer from the codes given below :

**List I**

**(Authors)**

(*a*) Goffman

(*b*) Giddens

(*c*) Derrida

(*d*) Schutz

**List II**

**(Concepts)**

(*i*) Impression management

(*ii*) Difference and deconstruction

(*iii*) Structure and agency

(*iv*) Stock of knowledge

(*v*) Communicative action

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (B) | (*i*) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) |
| (C) | (*iii*) | (*ii*) | (*i*) | (*iv*) |
| (D) | (*v*) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) |

4. When an elder brother who is a manager uses his influence to get a job for his younger brother in his company, this would be an instance of :

(A) White-collar crime

(B) Corruption

(C) Delinquency

(D) Depotism

3. सूची I शी सूची II ला जुळवा आणि खाली दिलेल्या संकेतातून योग्य उत्तर निवडा :

**सूची I**

**(लेखक)**

(*a*) गॉफमन

(*b*) गिडन्स

(*c*) देरिदा

(*d*) शुट्झ

**सूची II**

**(संकल्पना)**

(*i*) प्रभावाचे व्यवस्थापन

(*ii*) विभेदन व विरचना

(*iii*) संरचना व कर्तेपणा

(*iv*) ज्ञानभांडार

(*v*) संप्रेषणात्मक क्रिया

**संकेत :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (B) | (*i*) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) |
| (C) | (*iii*) | (*ii*) | (*i*) | (*iv*) |
| (D) | (*v*) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) |

4. कंपनीत मॅनेजर असणारा एक मोठा भाऊ जेव्हां आपात्र प्रभाव वापरून आपल्या लहान भावाला नोकरी मिळवून देण्याचा प्रयत्न करतो तेव्हां ते कशाचे उदाहरण म्हणून ओळखळे जाते ?

(A) पांढरपेशीय गुन्हा

(B) भ्रष्टाचार

(C) गुन्हेगारी

(D) वशिलेबाजी

5. What is the term for the form of development where nature is preserved for future generations ?
   (A) Social
   (B) Economic
   (C) Sustainable
   (D) Human

6. The concept of 'unequal and uneven development' has been put forward by which scholar ?
   (A) A.G. Frank
   (B) S. Amin
   (C) G. Myrdal
   (D) D. McClelland

7. Which of the following scholars was a pioneer in the sociological study of co-operatives in India ?
   (A) Y.B. Damle
   (B) B.S. Baviskar
   (C) Don Attwood
   (D) S.A. Salunkhe

8. In Wallerstein's world-systems analysis, which of the following constitute the units of analysis ?
   (A) Nation-state, World-empires, World-economies
   (B) Minisystems, World-empires, World-economies
   (C) World-empires, Nation-state, Minisystems
   (D) World-economies, Nation-state, Minisystems

5. भावी पिढ्यांसाठी जिथे निसर्ग संवर्धन केले जाते, अशा विकासाच्या प्रकारला कोणती संज्ञा वापरली जाते ?
   (A) सामाजिक
   (B) आर्थिक
   (C) शाश्वत
   (D) मानवी

6. 'असमान आणि असंतुलित विकास' ही संकल्पना कोणत्या विद्वानाने मांडली आहे ?
   (A) ए.जी. फ्रँक
   (B) समीर अमीन
   (C) जी. मिर्डाल
   (D) डी. मॅक्लेलँड

7. खालीलपैकी कोणते विद्वान भारतातील सहकाराच्या समाजशास्त्रीय अभ्यासाचे उद्गाते मानले जातात ?
   (A) वाय्.बी. दामले
   (B) बी.एस. बावीसकर
   (C) डॉन ॲटवुड
   (D) एस.ए. साळुंखे

8. वॉलरस्टीनच्या विश्व-व्यवस्था विश्लेषणात, खालीलपैकी कोणती व्यवस्था विश्लेषणाचा घटक बनते ?
   (A) राष्ट्र-राज्य, विश्व-साम्राज्य, विश्व-अर्थव्यवस्था
   (B) लघु-व्यवस्था, विश्व-साम्राज्य, विश्व-अर्थव्यवस्था
   (C) विश्व-साम्राज्य, राष्ट्र-राज्य, लघु-व्यवस्था
   (D) विश्व-अर्थव्यवस्था, राष्ट्र-राज्य, लघु-व्यवस्था

9. Which of the following constitutes the components of human development index ?

(I) Education

(II) Gender Empowerment

(III) Income

(IV) Life Expectancy

Choose the *correct* codes :

(A) (I) and (IV)

(B) (II) and (III)

(C) (I), (II) and (III)

(D) (I), (III) and (IV)

10. The view that tribal people should be allowed to retain their special characteristic while becoming a part of the mainstream is known as :

(A) Acculturation

(B) Assimilation

(C) Cultural Relativism

(D) Isolationism

11. Brundtland Commission Report, 'Our Common Future' is related to :

(A) Terrorism

(B) Environment and development

(C) Corruption

(D) Piracy

9. खालीलपैकी कोणता 'मानवी विकासाच्या निर्देशांकाचा घटक' बनतो ?

(I) शिक्षण

(II) लिंगभाव सबलीकरण

(III) उत्पन्न

(IV) आयुर्मान

**योग्य** संकेतांक निवडा :

(A) (I) आणि (IV)

(B) (II) आणि (III)

(C) (I), (II) आणि (III)

(D) (I), (III) आणि (IV)

10. आदिवासींना त्यांची विशेष वैशिष्ट्ये टिकवण्याची अनुमती द्यावी व त्यांनी मुख्य प्रवाहात सहभागी व्हावे, असे मानणारा विचारप्रवाह कोणता ?

(A) समसंस्कृतीकरण

(B) सामिलीकरण

(C) सांस्कृतिक सापेक्षतावाद

(D) अलगतावाद

11. ब्रंडलँड कमिशनाचा 'अवर कॉमन फ्युचर' हा कशाशी संबंधित आहे ?

(A) दहशतवाद

(B) पर्यावरण व विकास

(C) भ्रष्टाचार

(D) चौर्यकर्म

12. Silent Valley movement was mainly against :

(A) Dam construction

(B) Nuclear plant construction

(C) Thermal plant construction

(D) Land acquisition for industries

13. According to MNREGA, an adult in a rural area is assured of how many days of employment in a year ?

(A) 50

(B) 75

(C) 100

(D) 125

14. Productive work force in India is in the age group of :

(A) Between 15 to 65 years

(B) Between 18 to 65 years

(C) Between 13 to 65 years

(D) Between 15 to 45 years

15. As per 2011 census, male-female ratio in India is :

(A) 1000—950

(B) 1000—940

(C) 1000—835

(D) 1000—995

12. सायलेन्ट व्हॅली आंदोलन मुख्यत्वे .............. च्या विरोधी होते.

(A) धरण बांधणे

(B) आण्विक प्रकल्प उभारणी

(C) औष्णिक प्रकल्प उभारणी

(D) उद्योगासाठी जमीन संपादन

13. मनरेगा प्रमाणे ग्रामीण भागातील प्रौढाला एका वर्षात किती दिवस रोजगाराची हमी दिलेली आहे ?

(A) 50

(B) 75

(C) 100

(D) 125

14. भारतात उत्पादक श्रमशक्ती कोणत्या वयोगटातील आहे ?

(A) 15 ते 65 वर्षे

(B) 18 ते 65 वर्षे

(C) 13 ते 65 वर्षे

(D) 15 ते 45 वर्षे

15. भारतातील इ.स. 2011च्या जनगणना अहवालानुसार स्त्री-पुरुष प्रमाण किती आहे ?

(A) 1000—950

(B) 1000—940

(C) 1000—835

(D) 1000—995

16. According to the theory of social capillarity, people in the cities produce less children because :
   (A) They are faced with space problem
   (B) They cannot properly educate them
   (C) They have desire to go up the social ladder
   (D) There are social cleavages
17. National population policy 2000 does not deal with ....................... .
   (A) Women's education
   (B) Participation of men in planned parenthood
   (C) Prevention of attrocities on women
   (D) Health care for urban slums, tribal groups and migrant population
18. Which of the following years is known as 'Year of Big Divide' in India's population history ?
   (A) 1911
   (B) 1921
   (C) 1951
   (D) 1971
19. According to Dr. B.R. Ambedkar the dalits and marginalised in this country will have struggle against two adversaries. Which are they ?
   (I) Brahmanism
   (II) Capitalism
   (III) Socialism
   (IV) Communalism

   **Codes :**
   (A) (I) and (II)
   (B) (I) and (IV)
   (C) (II) and (III)
   (D) (III) and (IV)

16. 'सामाजिक कैशिकता' सिद्धांतानुसार नागरी लोक कमी मुलांना जन्म देतात, कारण :
   (A) त्यांना जागेची समस्या असते
   (B) ते त्यांना (मुलांना) शिक्षण देवू शकत नाहीत
   (C) त्यांना सामाजिक सोपान चढून जाण्याची इच्छा असते
   (D) सामाजिक विभिन्नतेमुळे
17. राष्ट्रीय लोकसंख्याविषयक धोरण-2000 मध्ये कोणत्या बाबीची दखल घेतली नाही ?
   (A) स्त्रियांचे शिक्षण
   (B) नियोजित पालकत्वातील पुरुषांचा सहभाग
   (C) स्त्रियांवरील अत्याचारावरील नियंत्रण
   (D) नागरी गलीच्छ वस्त्या, आदिवासी समूह आणि स्थळांतरीत लोकांसाठी आरोग्य सुविधा
18. भारतीय लोकसंख्येच्या इतिहासातील 'महाविभाजन वर्ष' खालीलपैकी कोणते आहे ?
   (A) 1911
   (B) 1921
   (C) 1951
   (D) 1971
19. डॉ.बी.आर. आंबेडकर यांच्या मते या देशातील दलित व सीमांत घटकांना दोन प्रतिस्पर्ध्यांशी संघर्ष करावा लागेल ते कोणते ?
   (I) ब्राह्मणवाद
   (II) भांडवलवाद
   (III) समाजवाद
   (IV) जमातवाद

   **संकेत :**
   (A) (I) व (II)
   (B) (I) व (IV)
   (C) (II) व (III)
   (D) (III) व (IV)

20. Who followed Marxism as a method of analysis rather than a political ideology ?
    (A) N.K. Bose
    (B) Radhakamal Mukherjee
    (C) D.P. Mukherjee
    (D) S.C. Dube

21. Which of the following matches is not *correct* ?
    (A) Louis Dumont— Caste based on purity and pollution
    (B) B.R. Ambedkar— Caste as graded form of inequality
    (C) M.N. Srinivas— Dominant caste
    (D) G.S. Ghurye— Racial origin of caste

22. Which of the following captures the correct features of slums ?
    (A) All the poor of city live in slums
    (B) Physical and spatial manifestation of urban poverty and inequality
    (C) All slum dwellers are poor
    (D) Only those at the bottom of the caste hierarchy live in slums

20. मार्क्सवादाचा अंगिकार एक राजकीय विचारप्रणाली म्हणून नव्हे, तर विश्लेषणाची पद्धत म्हणून कोणी केला ?
    (A) एन.के. बोस
    (B) राधाकमल मुखर्जी
    (C) डी.पी. मुखर्जी
    (D) एस.सी. दुबे

21. खालीलपैकी कोणती जोडी **चूक** आहे ?
    (A) लुई द्युमाँ – पावित्र्य व प्रदूषण यावर आधारित जात
    (B) बी.आर. आंबेडकर – जात म्हणजे श्रेणीबद्ध असमानता
    (C) एम.एन. श्रीनिवास – प्रभावी जात
    (D) जी.एस. घुर्ये – जातीचा वांशिक उगम

22. खालीलपैकी कोणता पर्याय गलिच्छ वस्तीचे वैशिष्ट्य योग्यपणे मांडतो ?
    (A) शहरातील दरिद्री असणारे सर्व लोक गलिच्छ वस्तीत राहतात
    (B) नागरी दारिद्र्य व असमानतेचे भौतिक व अवकाशात्मक अविष्करण
    (C) सर्व गलिच्छ वस्तीतील रहिवाशी दरिद्री असतात
    (D) जातीच्या उतरंडीत सर्वात तळाशी असणारे फक्त गलिच्छ वस्तीत राहतात

23. Surajit Sinha used two terms to capture the interaction of cultural streams in India. The terms used are :

(A) Parochial and universal stream

(B) Little and great tradition

(C) Simple and complex stream

(D) Modern and traditional

24. Match the following and select the correct answer from the codes given below :

**Column I**

**(Authors)**

(*a*) G.S. Ghurye

(*b*) A.R. Desai

(*c*) B.R. Ambedkar

(*d*) D. Hardiman

**Column II**

**(Books)**

(*i*) Caste in India

(*ii*) I and Other Explorations

(*iii*) State and Society in India

(*iv*) Feeding the Bania

(*v*) Tribal Life in India

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*v*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (B) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) | (*i*) |
| (C) | (*iii*) | (*v*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*ii*) | (*iii*) | (*i*) | (*iv*) |

23. सुरजित सिन्हा यांनी भारतातील सांस्कृतिक प्रवाहातील आंतरक्रियांचे वर्णन करण्यासाठी दोन संज्ञा वापरल्या आहेत. त्या संज्ञा :

(A) संकुचित व सार्वत्रिक प्रवाह

(B) लघु परंपरा व बृहत् परंपरा

(C) साधे व जटिल प्रवाह

(D) आधुनिक व पारंपरिक

24. जोड्या लावा आणि खाली दिलेल्या संहितेतून योग्य उत्तर निवडा :

**स्तंभ I**

**(लेखक)**

(*a*) जी.एस. घुर्ये

(*b*) ए.आर. देसाई

(*c*) बी.आर. आंबेडकर

(*d*) डी. हार्डीमान

**स्तंभ II**

**(ग्रंथ)**

(*i*) कास्ट इन इंडिया

(*ii*) आय् अॅन्ड अदर एक्सप्लोरेशन्स

(*iii*) स्टेट अॅन्ड सोसायटी इन इंडिया

(*iv*) फीडींग द बनिया

(*v*) ट्रायबल लाईफ इन इंडिया

**संकेत :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*v*) | (*iii*) | (*ii*) | (*iv*) |
| (B) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) | (*i*) |
| (C) | (*iii*) | (*v*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*ii*) | (*iii*) | (*i*) | (*iv*) |

25. Which of the following captures the approach of Indology to understand Indian reality ?
(A) Field view
(B) Book view
(C) Radical view
(D) Subaltern view

26. According to which theoretical conceptualisation, is the concept and practice of 'development' a reflection of western world hegemony ?
(A) Marxism
(B) Modernisation
(C) Globalisation
(D) Post-development

27. After liberalisation of Indian economy, there has been ....................... in the informalisation of labour.
(A) Increase
(B) Substantial decline
(C) No change
(D) Marginal decline

28. According to Karl Marx surplus value is produced in which mode of production ?
(A) Ancient-slavery
(B) Feudal
(C) Capitalist
(D) Socialist

25. भारतातील वास्तव समजण्यासाठी प्राच्य विद्याशाखेने खालीलपैकी कोणता दृष्टीकोन अंगिकारला आहे ?
(A) क्षेत्रिय दृष्टीकोन
(B) संहितानिष्ठ दृष्टीकोन
(C) मूलगामी दृष्टीकोन
(D) लोकउठाव दृष्टीकोन

26. कोणत्या सैद्धांतिक संकल्पनी करणानुसार विकासाची संकल्पना व व्यवहार हा पाश्चात्य जगाच्या धुरिणत्वाचे प्रतिबिंब आहे ?
(A) मार्क्सवादी
(B) आधुनिकीकरण
(C) जागतिकीकरण
(D) विकासोत्तर

27. भारतीय अर्थव्यवस्थेच्या उदारीकरणानंतर कामगारांच्या अनौपचारिकीकरणाचे नेमके काय झाले ?
(A) वाढ झाली
(B) भरपूर प्रमाणात घट झाली
(C) कोणताही बदल झाला नाही
(D) सीमांतिक घट झाली

28. कार्ल मार्क्सच्या मते, कोणत्या उत्पादन प्रणालीत अतिरिक्त मूल्याची निर्मिती होते ?
(A) प्राचीन-गुलामगिरी
(B) सरंजामदारी
(C) भांडवलशाही
(D) समाजवादी

29. Who among the following has formed 'The Bombay Millhands' Association' in 1890 ?
   (A) M.N. Roy
   (B) B.G. Tilak
   (C) G.K. Gokhale
   (D) N.M. Lokhande

30. The book 'Footloose Labour' was written by :
   (A) David Hardiman
   (B) Don Attwood
   (C) Jan Breman
   (D) Mario Rutten

31. Which of the following schemes is launched to provide training to the rural youths for their self-employment ?
   (A) IRDP
   (B) DWCRA
   (C) JRY
   (D) TRYSEM

32. The book 'Class and Class Conflict in Industrial Society' was written by :
   (A) Max Weber
   (B) Karl Marx
   (C) Ralph Dahrendorf
   (D) Vilfredo Pareto

29. खालीलपैकी कोणी 1890 मध्ये 'दि बाँबे मिलहँडस् असोशिएशन'ची स्थापना केली ?
   (A) एम.एन. रॉय
   (B) बी.जी. टिळक
   (C) जी.के. गोखले
   (D) एन.एम. लोखंडे

30. 'फुटलुज लेबर' हे पुस्तक कोणी लिहिले ?
   (A) डेव्हिड हार्डिमन
   (B) डॉन अॅटवूड
   (C) यान ब्रेमन
   (D) मारिओ रटन

31. ग्रामीण युवकांना त्यांच्या स्वयंरोजगाराच्या प्रशिक्षणाकरिता खालीलपैकी कोणती योजना कार्यान्वित करण्यात आली ?
   (A) आय.आर.डी.पी.
   (B) डवाक्रा
   (C) जे.आर.वाय.
   (D) ट्रायसेम

32. 'क्लास अँड क्लास कॉन्फ्लिक्ट इन इंडस्ट्रियल सोसायटी' हे पुस्तक कोणी लिहिले ?
   (A) मॅक्स वेबर
   (B) कार्ल मार्क्स
   (C) राल्फ डहरेन्डॉर्फ
   (D) विल्फ्रेडो परेटो

33. Which of the following scholars developed the 'Responsible Unionism Theory' in India ?

(A) D.R. Gadgil

(B) S.A. Dange

(C) N.M. Lokhande

(D) Ashok Mehta

34. Which of the following is *not* a determinant of population growth in India ?

(A) Poverty

(B) Inequality

(C) Illiteracy

(D) Cultural Practices

35. The biological capacity for reproduction of women is known as :

(A) Fertility

(B) Fecundity

(C) Birth rate

(D) Mortality

36. According to Malthus in the control over population famine represents an example of :

(A) Preventive checks

(B) Positive checks

(C) Negative checks

(D) Morbid checks

33. खालीलपैकी कोणत्या विद्वानानी 'जबाबदार संघवादाचा सिद्धांत' भारतात विकसित केली ?

(A) डी.आर. गाडगीळ

(B) एस.ए. डांगे

(C) एन.एम. लोखंडे

(D) अशोक मेहता

34. खालीलपैकी कोणता भारतातील लोकसंख्या वाढीचा निर्धारक **नाही** ?

(A) दारिद्र्य

(B) विषमता

(C) निरक्षरता

(D) सांस्कृतिक व्यवहार

35. स्त्रियांची पुनरुत्पादनाची जैविक क्षमता कोणत्या नावाने ओळखली जाते ?

(A) जनन

(B) जननक्षमता

(C) जन्मदर

(D) मर्त्यता

36. लोकसंख्या नियंत्रणाच्या बाबतीत माल्थस्च्या मते दुष्काळ हे कशाचे उदाहरण आहे ?

(A) प्रतिबंधात्मक नियंत्रक

(B) सकारात्मक नियंत्रक

(C) नकारात्मक नियंत्रक

(D) रोग नियंत्रक

37. Which of the following indicates the correct stages of demographic transition ?
    (I) Low fertility and low mortality
    (II) High fertility and low mortality
    (III) Low mortality and high fertility
    (IV) High fertility and high mortality
    **Codes :**
    (A) (IV), (II) and (I)
    (B) (I), (II) and (III)
    (C) (III), (II) and (I)
    (D) (I), (II) and (IV)

38. Who of the following indicated the emergence of capitalist mode of production in Indian agriculture ?
    (A) Ashok Rudra
    (B) Utsa Patnaik
    (C) Alice Thorner
    (D) Amit Bhaduri

39. Match List I with List II and select the correct answer from the codes given below :

**List I**
**(Villages)**

(*a*) Wangela
(*b*) Ramkheri
(*c*) Mahuva
(*d*) Rampura

**List II**
**(Sociologists)**

(*i*) A.C. Mayer
(*ii*) F.G. Bailey
(*iii*) M.N. Srinivas
(*iv*) I.P. Desai
(*v*) T.S. Epstein

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*v*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iii*) | (*v*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) | (*v*) |

37. खालीलपैकी कोणती अवस्था लोकसंख्या संक्रमणाची निर्देशक आहे ?
    (I) कमी जननदर आणि कमी मृत्युदर
    (II) उच्च जन्मदर आणि कमी मृत्युदर
    (III) कमी मृत्युदर आणि उच्च जन्मदर
    (IV) उच्च जननदर आणि उच्च मृत्युदर
    **संहिता :**
    (A) (IV), (II) आणि (I)
    (B) (I), (II) आणि (III)
    (C) (III), (II) आणि (I)
    (D) (I), (II) आणि (IV)

38. खालीलपैकी कोणी भारतातील कृषीक्षेत्रा मध्ये भांडवलशाही प्रणित उत्पादन प्रणालीची सुरुवात झाल्याचे निर्देशित केले ?
    (A) अशोक रुद्र
    (B) उत्सा पटनाईक
    (C) ॲलीस थॉर्नर
    (D) अमित भादुरी

39. खालील यादी I व यादी II मधील नोंदीच्या जोड्या लावा आणि दिलेल्या संकेतांकांतून योग्य उत्तर निवडा :

**सूची I**
**(खेडी)**

(*a*) वांगेला
(*b*) रामखेडी
(*c*) महुवा
(*d*) रामपुरा

**सूची II**
**(समाजशास्त्रज्ञ)**

(*i*) ए.सी. मायर
(*ii*) एफ.जी. बेली
(*iii*) एम.एन. श्रीनिवास
(*iv*) आय.पी. देसाई
(*v*) टी.एस. एपिस्टिअन

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*v*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iii*) | (*v*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) | (*v*) |

40. Which of the following is *not* a cause of rising trend of migration from rural to urban areas ?

(A) Decline of farm income

(B) Growing impoverishment of rural population

(C) Availability of alternative sources of livelihood in urban areas

(D) Better quality of urban life

41. Which of the following is associated with Green Revolution ?

(A) Land reforms

(B) Poverty alleviation

(C) HYV technology

(D) Agrarian unrest

40. खालीलपैकी कोणते ग्रामीण ते शहरी स्थळांतराच्या वाढत्या कलाचे कारण **नाही** ?

(A) शेती उत्पन्नातील घट

(B) ग्रामीण लोकसंख्येचे वाढते दारिद्र्य

(C) नागरी क्षेत्रातील उदरनिर्वाहाच्या पर्यायी साधनाची उपलब्धता

(D) नागरी जीवनाची चांगली गुणवत्ता

41. खालीलपैकी कोणता घटक हरित क्रांतीशी संबंधित आहे ?

(A) जमीन सुधारणा

(B) दारिद्र्य निर्मुलन

(C) अधिक उत्पन्न देणाऱ्या जातींचे तंत्रज्ञान

(D) शेती क्षेत्रातील अशांतता

42. Which one of the following is *not* a type of power elucidated by M. Foucault ?

(A) Bio-power

(B) Sovereign Power

(C) Disciplinary Power

(D) Surveillance Power

43. Derrida's method of deconstruction is aimed to bring out :

(*i*) Inconsistencies in the narrative

(*ii*) Gaps and silences

(*iii*) Experiences

(*iv*) Discovering structures

**Codes :**

(A) (*i*), (*ii*) and (*iii*)

(B) (*i*), (*iii*) and (*iv*)

(C) (*i*), (*ii*) and (*iv*)

(D) (*i*) and (*ii*)

44. Who coined the term 'Mistaken Modernity' ?

(A) Dipankar Gupta

(B) Yogendra Singh

(C) S.C. Dube

(D) Rudolph and Rudolph

42. खालीलपैकी कोणता एम. फूको यांनी स्पष्ट केलेल्या सत्तेच्या प्रकारांपैकी प्रकार **नाही** ?

(A) बायो–पावर

(B) सॉव्हरिन (सार्वभौम) पावर

(C) डिसिप्लिनरी पावर

(D) सर्वेलन्स पावर

43. देरिदाच्या विरचना पद्धतीचे उद्दिष्ट .............. उघड करणे हे आहे.

(*i*) कथनातील विसंगती

(*ii*) रिक्तता व स्तब्धता

(*iii*) अनुभव

(*iv*) संरचनेचा शोध

**संकेत :**

(A) (*i*), (*ii*) व (*iii*)

(B) (*i*), (*iii*) व (*iv*)

(C) (*i*), (*ii*) व (*iv*)

(D) (*i*) व (*ii*)

44. 'मिस्टेकन मॉडर्निटी' ही संज्ञा कोणी निर्माण केली ?

(A) दीपंकर गुप्ता

(B) योगेन्द्र सिंग

(C) एस.सी. दुबे

(D) रुडॉल्फ व रुडॉल्फ

45. Given below are two statements labelled as Assertion (A) and Reason (R) :

**Assertion (A) :** A.K. Saran was the first to put forward the argument for a 'Sociology for India'.

**Reason (R) :** Saran believed that European perspective needs to be countered by a perspective based on Indian values.

From the codes given below, which is the correct answer ?

**Codes :**

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

45. खाली दोन विधाने दिलेली आहेत. एकास विधान (A) आणि दुसऱ्यास कारण (R) असे संबोधले आहे :

**विधान (A) :** 'भारतासाठीचे समाजशास्त्र' या विषयी ए.के. सरन यांनी सर्वप्रथम आपला प्रतिवाद सादर केला.

**कारण (R) :** युरोपीयन दृष्टीकोनाला भारतीय मूल्यावर आधारित दृष्टीकोनाने प्रत्युत्तर दिले पाहिजे, असा सरन यांचा विश्वास होता.

खाली दिलेल्या संकेतामधून अचूक उत्तर निवडा :

**संकेतांक :**

(A) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे चुकीचे स्पष्टीकरण आहे

(C) (A) बरोबर आहे परंतु (R) चूक आहे

(D) (A) चूक आहे परंतु (R) बरोबर आहे

46. Who is the author of the book, 'Against the Madness of Manu' ?

(A) Leela Dube

(B) Sharmila Rege

(C) Neera Desai

(D) Vidyut Bhagwat

47. Which of the following would *not* be associated with secularism ?

(A) State not involved in religious issues

(B) State treating all religions equally

(C) Performing prayers at the beginning of a seminar

(D) Religion is a private matter

46. 'अगेन्स्ट द मॅडनेस ऑफ मनू' या पुस्तकाच्या लेखिका कोण आहेत ?

(A) लीला दुबे

(B) शर्मिला रेगे

(C) नीरा देसाई

(D) विद्युत भागवत

47. खालीलपैकी कोणती गोष्ट धर्मनिरपेक्षतावादाशी संबंधित **नाही** ?

(A) राज्यसंस्था धार्मिक बाबींत सहभागी नाही

(B) सर्व धर्मांना राज्यसंस्था समान वागणूक देते

(C) चर्चा सत्रांच्या सुरुवातीला पूजाअर्चा करणे

(D) धर्म ही खाजगी बाब आहे

48. The debate on domestic labour is based on :

(A) Division of labour

(B) Relations of production

(C) Sexuality

(D) Social Reproduction

49. Patricia Hill Collins's Epistemology can be defined as :

(A) Philosophic viewpoint based on epistemology

(B) What one knows is affected by the standpoint one has in society

(C) Critical epistemology facilitating interpretation of life

(D) Multidimensional perspective to experience and reality

48. घरगुती श्रमाविषयीचा वादविवाद खालीलपैकी कशाशी संबंधित आहे ?

(A) श्रमविभागणी

(B) उत्पादनाचे संबंध

(C) लैंगिकता

(D) सामाजिक पुनरुत्पादन

49. पॅट्रिशिया हिल कॉलिन्स यांच्या ज्ञानमीमांसाशास्त्राची व्याख्या खालील प्रमाणे करता येईल :

(A) ज्ञानमीमांसाशास्त्रावर आधारित तत्वज्ञानात्मक दृष्टीकोन

(B) आपल्याला जे ज्ञान होते, ते आपल्या सामाजिक स्थानावर आधारलेले असते

(C) असे चिकित्सक ज्ञानमीमांसाशास्त्र, जे जीवनाचा अन्वयवाद सुकर करते

(D) अनुभव व वास्तवाविषयीचा बहुआयामी दृष्टीकोन

50. The Khairlanji Atrocities case explains :

(*i*) Combination of caste hierarchy and gender hierarchy

(*ii*) Humiliation of Dalits

(*iii*) Rivalry on material level

(*iv*) Coercion, violence and attack on dignity of Dalit women

Select the *correct* option from the codes given below :

(A) (*i*) and (*iv*)

(B) (*i*), (*ii*), (*iii*) and (*iv*)

(C) (*i*), (*ii*) and (*iv*)

(D) (*ii*) and (*iv*)

50. खैरलांजी अत्याचार घटना कशाचे स्पष्टीकरण देते ?

(*i*) जातीचे स्तरीकरण व लिंगभावाचे स्तरीकरण

(*ii*) दलितांची मानखंडना

(*iii*) ऐहिक पातळीवरील शत्रुत्व

(*iv*) स्त्रियांच्या प्रतिष्ठेवर हल्ला, दमन व हिंसा

खालील संकेतांमधून योग्य पर्याय निवडा :

(A) (*i*) व (*iv*)

(B) (*i*), (*ii*), (*iii*) व (*iv*)

(C) (*i*), (*ii*) व (*iv*)

(D) (*ii*) व (*iv*)

51. Match List I with List II and select the correct answer from the codes given below :

**List I**

**(Agrarian Unrest)**

(*a*) Moplah Rebellion

(*b*) Deccan Riots

(*c*) Naxalbari Movement

(*d*) Halipratha Movement

**List II**

**(States)**

(*i*) Maharashtra

(*ii*) Kerala

(*iii*) Bihar

(*iv*) West Bengal

(*v*) Gujarat

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iv*) | (*iii*) | (*v*) |
| (B) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*iv*) | (*ii*) | (*v*) | (*iii*) |
| (D) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*v*) |

51. खालील यादी I व यादी II मधील नोंदींच्या जोड्या लावा आणि दिलेल्या संकेतांकातून योग्य उत्तर निवडा :

**यादी I**

**(कृषी क्षेत्रातील अशांतता)**

(*a*) मोपला बंडखोर

(*b*) दख्खनची दंगल

(*c*) नक्षलवादी चळवळ

(*d*) हलीप्रथा चळवळ

**यादी II**

**(राज्ये)**

(*i*) महाराष्ट्र

(*ii*) केरळ

(*iii*) बिहार

(*iv*) पश्चिम बंगाल

(*v*) गुजरात

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*iv*) | (*iii*) | (*v*) |
| (B) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*iv*) | (*ii*) | (*v*) | (*iii*) |
| (D) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*v*) |

52. Match the following and select the *correct* answer from the codes given below :

**List I**

**(Theory)**

(*a*) Liberal Feminism

(*b*) Socialist Feminism

(*c*) Radical Feminism

(*d*) Eco-Feminism

**List II**

**(Argument)**

(*i*) Reproduction and Violence are key concerns

(*ii*) Women as oppressed class

(*iii*) Equal status and opportunities for men and women

(*iv*) Women have potential to nurture society and nature

(*v*) Economic empowerment is most important

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iii*) | (*ii*) | (*i*) | (*iv*) |
| (B) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (D) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |

52. जोड्या लावा आणि खाली दिलेल्या संकेतातून **योग्य** उत्तर निवडा :

**सूची I**

**(सिद्धांत)**

(*a*) उदारमतवादी स्त्रीवाद

(*b*) समाजवादी स्त्रीवाद

(*c*) जहालमतवादी स्त्रीवाद

(*d*) परिस्थितीशास्त्रीय स्त्रीवाद

**सूची II**

**(प्रतिपादन)**

(*i*) प्रजनन व हिंसा हे कळीचे आस्थाविषय

(*ii*) स्त्रिया म्हणजे शोषित वर्ग

(*iii*) स्त्री व पुरुषांना समान दर्जा व संधी

(*iv*) स्त्रियांकडे निसर्ग व समाजाचे भरणपोषण करण्याची क्षमता असते

(*v*) आर्थिक सबलीकरण सर्वात महत्त्वाचे असते

**संकेत :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iii*) | (*ii*) | (*i*) | (*iv*) |
| (B) | (*ii*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |
| (D) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |

53. Declining sex ratio in India is a result of :

(*i*) Cultural subordination of women

(*ii*) Materialist concerns about dowry

(*iii*) Sexual assaults on women

(*iv*) Son preference

Select the *correct* option from the codes given below :

(A) (*i*), (*ii*) and (*iv*)

(B) (*i*) and (*iv*)

(C) (*ii*), (*iii*) and (*i*)

(D) (*ii*), (*iv*) and (*iii*)

53. भारतातील घटता लिंगदर ........................ चा परिणाम आहे.

(*i*) स्त्रियांचे सांस्कृतिक दुय्यमत्व

(*ii*) हुंड्याविषयीच्या ऐहिकतावादी धारणा

(*iii*) स्त्रियांवरील लैंगिक हल्ले

(*iv*) पुत्र अग्रक्रम

खालील संकेतांपैकी **योग्य** पर्याय निवडा :

(A) (*i*), (*ii*) व (*iv*)

(B) (*i*) व (*iv*)

(C) (*ii*), (*iii*) व (*i*)

(D) (*ii*), (*iv*) व (*iii*)

54. Given below are two statements, one is labelled as Assertion (A) and the other is labelled as Reason (R) :

**Assertion (A) :** Whereas women's entry in formal jobs is assigned to modernity, their contribution as torch bearers of cultural practices is not acknowledged.

**Reason (R) :** Most scholars looking at Indian society analysed it in terms of a binary division between tradition and modernity.

Select the *correct* codes :

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanatin of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanatin of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

54. खालील एक विधान (A) आणि दुसऱ्यास कारण (R) असे संबोधले आहे :

**विधान (A) :** स्त्रियांचा औपचारिक नोकऱ्यातील प्रवेश आधुनिकतेमुळे होतो, असे मानले जाते, परंतु त्यांच्या सांस्कृतिक व्यवहाराला असणाऱ्या योगदानाची दखल घेतली जात नाही.

**कारण (R) :** भारतीय समाजाचे अध्ययन करणाऱ्या बव्हंशी विद्वानांनी भारतीय समाजाचे विश्लेषण द्वैती पद्धतीने परंपरा व आधुनिकता या प्रकारे केले आहे.

खालीलपैकी योग्य संकेत निवडा :

(A) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) व (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे बरोबर आहे परंतु (R) हे चूक आहे

(D) (A) हे चूक आहे परंतु (R) हे बरोबर आहे

55. In a factory the labourers employed are paid wages at rate Rs. 100.00 (one hundred) for rolling 1000 Bidis (one thousand). This form of labour is called :

(A) White-collar worker

(B) Casual labour

(C) Blue-collar worker

(D) Agricultural labour

56. Match List I with List II and select the correct answer from the codes given below :

**List I**

**(Books)**

(*a*) Studies in Agrarian Social Structure

(*b*) Social Background of Indian Nationalism

(*c*) Remembered Village

(*d*) South India : Yesterday, Today and Tomorrow

**List II**

**(Authors)**

(*i*) Daniel Thorner

(*ii*) Andre Beteille

(*iii*) T.S. Epstein

(*iv*) A.R. Desai

(*v*) M.N. Srinivas

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iv*) | (*v*) | (*iii*) |
| (B) | (*i*) | (*iv*) | (*v*) | (*ii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iii*) | (*iv*) |
| (D) | (*v*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |

55. एका कारखान्यामध्ये नेमलेल्या कामगारांना एक हजार बिड्या वळण्यासाठी शंभर रुपये दिले जातात. श्रमिकांच्या या प्रकाराला काय म्हणतात ?

(A) पांढरपेशीय कामगार

(B) प्रासंगिक कामगार

(C) कामगार

(D) कृषिविषयक कामगार

56. खालील यादी I व यादी II मधील नोंदीच्या जोड्या लावा आणि दिलेल्या संकेतांकातून योग्य उत्तर निवडा :

**यादी I**

**(पुस्तके)**

(*a*) स्टडीज इन ॲग्रेरियन सोशल स्ट्रक्चर

(*b*) सोशल बॅक्ग्राऊंड ऑफ इंडियन नॅशनॅलिझम

(*c*) रिमेम्बर्ड व्हिलेज

(*d*) साऊथ इंडिया : यस्टरडे, टुडे अँड टुमारो

**यादी II**

**(लेखक)**

(*i*) डॅनिएल थॉर्नर

(*ii*) आन्द्रे बेते

(*iii*) टी.एस. एपिस्टअन्

(*iv*) ए.आर. देसाई

(*v*) एम.एन. श्रीनिवास

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iv*) | (*v*) | (*iii*) |
| (B) | (*i*) | (*iv*) | (*v*) | (*ii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iii*) | (*iv*) |
| (D) | (*v*) | (*iv*) | (*i*) | (*iii*) |

57. The latest science and technology policy of India 2013 emphasises on :
(A) Technological competence
(B) Promoting Scientific Temper
(C) Increase in Investment in Research and Development
(D) Innovation

58. Till what age is the labour of a youngster classified as child labour in India ?
(A) 12
(B) 13
(C) 14
(D) 15

59. The concept of absolute poverty is grounded in the idea of :
(A) Social exculsion
(B) Cultural relativism
(C) Social deprivation
(D) Subsistence

60. According to PESA Act, which institution has been given power to grant licence for mining in tribal areas ?
(A) Village Panchayat
(B) Village Sarpanch
(C) Gram Sabha
(D) Gram Talati

57. भारतातील इ.स. 2013 मधील विज्ञान आणि तंत्रज्ञानविषयक अलिकडील धोरणात कोणत्या बाबीला महत्व दिले आहे ?
(A) तंत्रज्ञानविषयक कार्यक्षमता
(B) वैज्ञानिक दृष्टीकोनाला उत्तेजन
(C) संशोधन आणि विकासासाठीच्या गुंतवणुकीत वाढ
(D) नाविन्यता

58. भारतात किती वर्षे वयापर्यंतच्या तरुणाचे श्रम हे बालमजुरी या वर्गीकरणात येतात ?
(A) 12
(B) 13
(C) 14
(D) 15

59. निरपेक्ष दारिद्र्याची संकल्पना .................. कल्पनेवर आधारलेली आहे.
(A) सामाजिक वर्जितता
(B) सांस्कृतिक सापेक्षतावाद
(C) सामाजिक वंचितता
(D) निर्वाह

60. 'पेसा' कायद्यानुसार कोणत्या संस्थेला आदिवासी क्षेत्रामध्ये खाणकाम करण्याचा परवाना देण्याचा अधिकार देण्यात आली आहे ?
(A) ग्राम पंचायत
(B) ग्राम सरपंच
(C) ग्राम सभा
(D) ग्राम तलाठी

61. The committee to investigate into incidence of malnutrition in Melghat area of Maharashtra was headed by :
(A) Abhay Bang
(B) Sham Ashtekar
(C) Rani Bang
(D) Abhay Shukla

62. Name the scholar who uses the concepts of 'orthogenetic' and 'heterogenetic' changes in his analysis of process of modernisation in India ?
(A) M. Singer
(B) Y. Singh
(C) M.N. Srinivas
(D) S.C. Dube

63. Which of the following committees highlighted the depressed socio-economic and educational status of Muslims in India ?
(A) Bhore Committee
(B) Sachchar Committee
(C) Mandal Commission
(D) Swaminathan Committee

64. Which of the tribal groups of North-East is seeking a separate state to be carved out of Assam ?
(A) Bodo
(B) Mizo
(C) Garo
(D) Kuki

61. महाराष्ट्राच्या मेळघाट भागातील कुपोषणाचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समितीचे प्रमुख ............................ होते.
(A) अभय बंग
(B) शाम अष्टेकर
(C) राणी बंग
(D) अभय शुक्ला

62. भारतातील आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचे विश्लेषण करताना 'अंतर्गत' व 'बहिर्गत' परिवर्तनाच्या संकल्पना कोणत्या विद्वानाने वापरल्या ?
(A) एम. सिंगर
(B) वाय. सिंग
(C) एम.एन. श्रीनिवास
(D) एस.सी. दुबे

63. भारतातील मुस्लीमांचा सामाजिक-आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपणा अधोरेखीत केलेल्या समितीचे नाव काय आहे ?
(A) भोर समिती
(B) सच्चर समिती
(C) मंडल आयोग
(D) स्वामीनाथन समिती

64. आसाममधुन वेगळे काढून ईशान्य भागातील कोणता आदिवासी समुह स्वतंत्र राज्याची मागणी करत आहे ?
(A) बोडो
(B) मिझो
(C) गारो
(D) कुकी

65. Which of the following is a tribe of Andaman Islands ?

(A) Santhal

(B) Bhil

(C) Onge

(D) Toda

66. Foucault's research was focused broadly in three areas of history. Which are they ?

(I) Study of Psychiatry

(II) Medicine

(III) Penology

(IV) Education

**Codes :**

(A) (I) and (II)

(B) (II), (III) and (IV)

(C) (I), (II) and (III)

(D) (I), (III) and (IV)

65. खालीलपैकी कोणते आदिवासी अंदमान बेटावर आढळतात ?

(A) संथाल

(B) भील

(C) ओंगे

(D) टोडा

66. फूको यांचे संशोधन व्यापकपणे इतिहासाच्या तीन क्षेत्रात केंद्रीभूत झालेले होते. ती क्षेत्र कोणती ?

(I) मनोविकारशास्त्राचे अध्ययन

(II) औषधविज्ञान

(III) दंडशास्त्र

(IV) शिक्षण

**संकेत :**

(A) (I) व (II)

(B) (II), (III) व (IV)

(C) (I), (II) व (III)

(D) (I), (III) व (IV)

67. Which of the following sets has the correct list of communities considered to be minorities in India ?

(A) Christians, Muslims, Jews

(B) Muslims, Buddhists, Jains

(C) Christians, Zoroastrians, Jains

(D) Sikhs, Zoroastrians, Buddhists

68. Which language often used and spoken in Indian Parliament is not listed in Eighth schedule of the Indian Constitution ?

(A) Sindhi

(B) Nepali

(C) Santhali

(D) English

67. खालीलपैकी कोणत्या संचातील समुदाय भारतातील अल्पसंख्याक म्हणून संबोधले जातात ?

(A) ख्रीश्चन, मुस्लीम, ज्यु

(B) मुस्लीम, बौद्ध, जैन

(C) ख्रीश्चन, झोरास्ट्रीन, जैन

(D) शीख, झोरास्ट्रीन, बौद्ध

68. भारतीय संसदेत कोणती भाषा जास्त प्रमाणात बोलली व वापरली जाते की जी भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूची मध्ये समाविष्ट नाही ?

(A) सिंधी

(B) नेपाळी

(C) संथाली

(D) इंग्रजी

69. Given below are two statements. One is labelled Assertion (A) and other is Reason (R) :

**Assertion (A) :** There is no absolute way of defining a deviant art, as deviance is relative.

**Reason (R) :** Deviance is culturally determined and cultures change overtime and vary from society to society.

Select the *correct* answer from the codes given below :

**Codes :**

(A) Both (A) and (R) are true and (R) is the correct explanatin of (A)

(B) Both (A) and (R) are true but (R) is not the correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

69. खाली दोन विधााने दिली आहेत. एकास विधान (A) आणि दुसऱ्यास कारण (R) असे संबोधले आहे :

**विधान (A) :** विपथगामिकृतिची व्याख्या करण्याचा अंतिम मार्ग नसून विपथगामीत्व सापेक्ष असते.

**कारण (R) :** विपथगामीत्व सांस्कृतिक-दृष्ट्या निर्धारित होते व संस्कृति काळानुसार व समाजानुसार बदलते.

खाली दिलेल्या संकेतांमधून अचूक उत्तर निवडा :

**संकेत :**

(A) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत आणि (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण आहे

(B) (A) आणि (R) दोन्ही बरोबर आहेत परंतु (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण नाही

(C) (A) हे बरोबर आहे परंतु (R) हे चूक आहे

(D) (A) हे चूक आहे परंतु (R) हे बरोबर आहे

70. Which of the following speech varieties of Hindi is spoken in Uttarakhand ?

(1) Garhwali

(2) Marwari

(3) Kumauni

(4) Bhojpuri

The *correct* code is :

(A) (1) and (2)

(B) (1) and (3)

(C) (2), (3) and (4)

(D) (1), (2) and (4)

71. As per the prevention of Domestic Violence Act, 2005, violence is defined to include which of the following :

(1) Physical

(2) Mental

(3) Sexual

(4) Economic

Choose the *correct* code from below :

(A) (3) only

(B) (1) and (3)

(C) (1), (2) and (3)

(D) (1), (2), (3) and (4)

70. उत्तराखंडमध्ये खालीलपैकी कोणत्या प्रकारच्या हिंदी बोली बोलली जाते ?

(1) गढवाली

(2) मारवारी

(3) कुमाऊनी

(4) भोजपुरी

योग्य संकेत निवडा :

(A) (1) व (2)

(B) (1) व (3)

(C) (2), (3) व (4)

(D) (1), (2) व (4)

71. कौटुंबिक हिंसा प्रतिबंध कायदा 2005च्या अन्वये हिंसेच्या व्याख्येत खालीलपैकी कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो ?

(1) शारीरिक

(2) मानसिक

(3) लैंगिक

(4) आर्थिक

योग्य संकेत निवडा :

(A) केवळ (3)

(B) (1) व (3)

(C) (1), (2) व (3)

(D) (1), (2), (3) व (4)

72. Which of the following books reflects Gandhian approach to development ?

(A) The Asian Drama

(B) The Small is Beautiful

(C) The Social Background of Indian Nationalism

(D) The Annihilation of Caste

73. In whose philosophical work the intellectual roots of Phenomenological Sociology of Schutz lie ?

(A) Edmund Husserl

(B) Herbert Mead

(C) George Hegel

(D) Martin Heidegger

72. खालीलपैकी कोणत्या पुस्तकामध्ये विकासाचा गांधीवादी दृष्टीकोन प्रतिबिंबीत होतो ?

(A) द एशिअन ड्रामा

(B) द स्मॉल इज ब्यूटिफूल

(C) द सोशल बॅकग्राउंड ऑफ इंडियन नॅशनॅलिझम

(D) द ॲनिहिलेशन ऑफ कास्ट

73. शुट्झ यांच्या प्रघटनाशास्त्रीय समाजशास्त्राची बौद्धिकमुळे कोणाच्या तत्वज्ञानात्मक कार्यात आहेत ?

(A) एडमंड हुस्रल

(B) हर्बर्ट मीड

(C) जॉर्ज हेगेल

(D) मार्टीन हैडेगर

74. "A process in which individuals come to mutual understanding and consensus through non-coercive debate and discussion." This applies to :

(A) Communicative Action

(B) Colonization of lifeworld

(C) Rational Communication

(D) Communicative lifeworld

75. Which of the following, according to Althusser, are the instruments of ideological state apparatus ?

(I) Education

(II) Army

(III) Family

(IV) Prison

(V) Media

Choose the *correct* answer from the codes given below :

(A) (I), (II) and (III)

(B) (II), (IV) and (V)

(C) (I), (IV) and (V)

(D) (I), (III) and (V)

74. ''अशी प्रक्रिया की जिच्यात अदमनात्मक वादविवाद व चर्चाद्वारे व्यक्ती परस्पर सामंजस्य व मतैक्याला पोचतात.'' ही व्याख्या कोणत्या संकल्पनेला लागू पडते ?

(A) संप्रेषणात्मक क्रिया

(B) जीवजगताचे वसाहतीकरण

(C) तार्किक संप्रेषण

(D) संप्रेषणात्मक जीवजगत

75. अल्थूजर यांच्या मते खालीलपैकी तत्वप्रणालीयुक्त शासन यंत्रणे साधने कोणती ?

(I) शिक्षण

(II) सेनादल

(III) कुटुंब

(IV) तुरुंग

(V) माध्यमे

खाली दिलेल्या संकेतातून अचूक उत्तर निवडा :

(A) (I), (II) व (III)

(B) (II), (IV) व (V)

(C) (I), (IV) व (V)

(D) (I), (III) व (V)

**ROUGH WORK**

## ROUGH WORK